# प्रकरण पहिले

## प्रकरण पहिले

# समकालीन कथालेखनाचे स्वरूप

**प्रस्तावना -**

रवींद्र शोभणे हे नव्वदच्या दशकांतील मराठी मधील एक महत्त्वाचे आश्वासक लेखक आहेत. ' प्रवाह ', ' रक्तध्रुव ', ' कोंडी ', ' चिरेबंद ', ' सव्वीस दिवस ' ह्या कादंबऱ्या त्यांच्या नावावर आहेत. ' वर्तमान ', ' दाहीदिशा ' आणि ' शहामृग ' असे त्यांचे कथासंग्रह आतापर्यंत प्रकाशित झाले आहेत. शिवाय समीक्षापर व अन्य स्फुट स्वरूपाचे लेखनही शोभणे यांनी केले आहे.

रवींद्र शोभणे यांची कथा पारंपरिक, घटनाप्रधान आणि कथानकप्रधान असलेली दिसते. परंतु कथालेखनामध्ये नवे प्रयोग केलेले आढळत नाही. समकालीन कथाकारांनी कथालेखनाचे अनेक प्रयोग केले आणि मराठी कथा विकसित करण्याचा प्रयत्न केला. रवींद्र शोभणे यांच्या कथालेखनात प्रायोगिक पातळीवरचे नाविन्य आढळत नसले तरी ती कथा महत्त्वाची मानली जाते. त्यांची कथा महत्त्वाची का मानली जाते ? याचा शोध प्रस्तुत अभ्यासात घेतला जाईल.

रवींद्र शोभणे हे समकालीन साहित्य लेखन करणाऱ्या लेखकांपैकी एक लेखक आहेत. आता पर्यंत त्यांचे ' शहामृग ', ' वर्तमान ', ' दाहीदिशा ' हे तीनच कथासंग्रह प्रकाशित झालेले आहेत. यातील काही कथा ह्या ग्रामीण जीवनाचे चित्रण करणाऱ्या आहेत. तर काही नागर जीवनाचे चित्रण करणाऱ्या आहेत. पण सर्व कथांचे स्वरूप मात्र समाकालीन असलेले दिसून येते. त्यांच्या कथांचा अभ्यास केल्यास असे जाणवते की, या कथा नवकथेपेक्षा वेगळ्या आहेत व समकालीन कथेशी संवाद साधणाऱ्या आहेत. शोभणेंच्या कथातील वेगळेपण पाहण्यासाठी आपणाला समकालीन कथालेखनाचे स्वरूप पाहणे गरजेचे आहे.

**❖ समकालीन कथालेखनाचे स्वरूप :-**

मराठी साहित्याचे स्वरूप कालखंडानुसार बदललेले दिसून येते.

१) १८१८ ते १८८५ - अव्वलइंग्रजी कालखंड

२) १८८५ ते १९२० - अर्वाचीन साहित्याचा कालखंड

३) १९२० ते १९४५ - आधुनिक साहित्याचा कालखंड

४) १९४५ ते १९६० व १९६० ते १९८५ - समकालीन साहित्याचा कालखंड

१८१८ ते १८८५ अव्वलइंग्रजी कालखंड म्हणून ओळखला जातो. १८१८ मध्ये मराठी राज्याचा अस्त झाला आणि महाराष्ट्रात इंग्रजी राजवट सुरु झाली. तिथपासून १८८५ पर्यंतच्या काळाला '' अव्वल इंग्रजी कालखंड '' असे म्हटले जाते. ह्या काळात मुख्यत: संस्कृत व इंग्रजीतील काव्याचे व इतरही भाषांतरित साहित्य निर्माण झाले.

१८८५ ते १९६० ह्या कालखंडातील साहित्याला ' अर्वाचीन ' अशी संज्ञा दिली जाते. कारण हे साहित्य प्राचीन नव्हते. या कालखंडात देव, दानव, स्वर्ग, परलोक,आत्मा, परमात्मा सारख्या कल्पना नाहीशा झाल्या व इहलोकाला महत्त्व प्राप्त झाले. इंग्रजी राजवटीमुळे इंग्रजी साहित्य, त्यांची संस्कृती याचा परिचय झाला व विचार प्रवाहाला वेगळी दिशा मिळाली. त्यातूनच अर्वाचीन साहित्य निर्माण झाले व. दि. कुलकर्णी यांनी ' अर्वाचीन मराठी सारस्वतकार ' या पुस्तकात अर्वाचीन कालखंडाबाबत म्हटले आहे की, '' इंग्रजी विद्या आणि संस्कृती यांच्या संपर्कातून, साहचर्यातून आणि संघर्षातून आपले मन हळूहळू बदलत गेले, त्याचे जुनेपण जाऊन त्यास अर्वाचीनत्व आले. आपले विचार आणि त्याबरोबर आचार यांत बदल झाला. जीवन पालटले ही उत्क्रांती इंग्रजी राजवटीच्या आरंभापासून जाणीवपूर्वक आणि निश्चयपूर्वक घडून येत होती. घडविली जात होती. या उत्क्रांतीच्या विविध अवस्था १८३०-३२ पासून ते पुढे १९४५-५० पर्यंत म्हणजे सव्वाशे वर्षे पिढ्यापिढ्यांतून सलगपणे आपणांस पाहावयास मिळतात. त्यांत कार्यकारणभाव आहे, एकसूत्रता आहे, यामुळे १८१८ ते १९५० या समग्र कालखंडाचा अभ्यास ' अर्वाचीन कालखंड ' म्हणून एकसंधपणे करणे योग्य ठरते ''[१] अर्वाचीन साहित्य निर्मितीला इंग्रजी राजवट कारणीभूत ठरली. कारण इंग्रजी साहित्याची ओळख होऊन विचाराला नवी दिशा मिळाली. या काळात बालकवी, गोविंदग्रज, ना. वा. टिळक सारखे कवी होऊन गेले. बाळ गंगाधर टिळक, गोपाळ गणेश आगरकर,

विष्णूशास्त्री चिपळूणकर सारखे विचारवंत होऊन गेले. हा कालखंड टिळक आगरकरांचा म्हणूनही ओळखला जात होता. त्यांनी सर्वांना आपल्या लिखाणातून व्यक्तिस्वातंत्र्याची जाणीव करुन दिली. परंतु १९२० पर्यंत हे सर्व विचारवंत निधन पावले व या कालखंडाचा अंत झाला.

१९२० ते १९४५ पर्यंतचा काळ हा आधुनिक साहित्याचा काळ म्हणूनच ओळखला जातो. अर्वाचीन साहित्यातून आधुनिकता विशेषरूपाने प्रकट झाली. इंग्रजी शिक्षणाने व आधुनिक जीवनपध्दतीने समाजजीवनाचे वेगाने आधुनिकीकरण झाले होते. त्याचा परिणाम साहित्यावरही झालेला होता व मानव-केंद्रित दृष्टिकोण उदयास आला होता. ह्या आधुनिक दृष्टिकोणाचा साहित्यावर प्रभाव पडला व साहित्यातून व्यक्ती जीवनातील सुखदु:खे, व्यक्ती आणि समाज यातील संघर्ष याच्या चित्रणाला प्राधान्य मिळाले. परंतु काही काळानंतर साहित्यातील आधुनिकता कमी होऊ लागली. १९४५ च्या सुमारास नवे साहित्य आले.

१९४५ पासून पुढच्या काळातल्या साहित्याला ‘ समकालीन ’ साहित्य ही संज्ञा आहे. तसेच त्याला ‘ नवसाहित्य ’ अथवा ‘ अत्याधुनिक ’ साहित्य असेही म्हटले जाते. १९४५ पासून १९६० पर्यंतच्या साहित्याचा उल्लेख करताना सामान्यत: नवकथा, नवकविता, नवकादंबरी अशा संज्ञा वापरल्या गेलेल्या आहेत. १९६० नंतरच्या साहित्याच्या बाबतीत समकालीन ही संज्ञा रुढ आहे.

साहित्याचा प्रवास हा वरील प्रमाणे कालखंडानुसार बदलत येवून समकालीन साहित्याजवळ थोडासा स्थिर झालेला दिसतो. समकालीन कथालेखनाचे स्वरूप पाहण्यासाठी समकालीन म्हणजे काय ? हे आधी पाहिले पाहिजे.

### ❖ समकालीन म्हणजे काय ?

“ समकालीन साहित्य म्हणजे जे साहित्य आपल्या काळाबरोबर आहे ज्या काळात ते निर्माण होत असते त्या काळाचे प्रतिबिंब त्यात आहे त्या काळातील विचार, जाणिवा, मते ज्या साहित्यातून व्यक्त होतात असे साहित्य ”[२]

थोडक्यात - ‘ काळाबरोबर असणे, एकाच काळात अस्तित्वात असणे ’ म्हणजे समाकालीन असणे.

१९४५ च्या सुमारास ' नवे ' साहित्य आले. ह्या नव्या साहित्यानंतर म्हणजे १९६० नंतर साहित्यात समकालीन जीवनाचे, जाणिवांचे चित्रण आढळते म्हणून त्यास ' समकालीन ' असे नाव मिळाले.

समकालीन साहित्याची संज्ञा पाहिल्यानंतर समकालीन कथालेखन कशा प्रकारे होत गेले ते आता आपण पाहू.

## ❖ समकालीन कथालेखन -

समकालीन साहित्याची संज्ञा पाहता असे दिसून येते की समकालीन साहित्याची सुरुवात १९६० नंतर सुरू झाली तरी १९४५ पासून ' समकालीन साहित्याचा ' कालखंड सुरू होतो. १९४५ साली दुसरे जागतिक महायुध्द संपले. १९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाले व १९४५ पासून नव्या कालखंडाची सुरुवात झाली. ह्या काळातील मानवाच्या इच्छा-आकांक्षा, प्रयत्न, असहायता, पराभव, वेदना, विद्रोह, स्वप्ने याचे प्रामाणिक चित्रण साहित्यातून होऊ लागले.

१९६० ते १९८५ ह्या कालखंडातील साहित्य हे समकालीन साहित्य ठरते. कारण ह्या साहित्यात १९६० नंतरच्या मानवी स्थितीचे चित्रण येते. परंतु१९६० ते १९८५ ह्या काळातील सारेच लेखन समकालीन नाही. काही समकालीन आहे. तर काही समकालीन देखील नाही. कारण कोणत्याही काळात गंभीर स्वरूपाच्या लेखनासोबत मनोरंजक असे लेखनही मोठ्या प्रमाणात केले जात असते. तसेच ते १९४५ ते १९६० आणि १९६० ते १९८५ ह्या दोन्ही कालखंडातही निर्माण झालेले आहे. मात्र हे लेखन समकालीन होऊ शकत नाही. कारण समकालीन लेखनात वास्तवाचे व आधुनिक दृष्टिकोणातून केलेले चित्रण असावे अशी अपेक्षा असते. आतापर्यंत साहित्याच्या वाचकाची जाण वाढली होती व लेखकांचीही साहित्याकडे पाहण्याची भूमिका बदलली होती. परंतु समकालीन साहित्य लोकप्रिय असतेच असे नाही. काही कलाकृती लोकप्रिय होतात. पण सर्वच लोकप्रिय कलाकृती थोर असतातच असे नाही. वाचकांचे मन सुखावणाऱ्या, त्यांचे स्वप्नरंजन करणाऱ्या, भूतकाळातील रम्य गोष्टींचे चित्रणकरणाऱ्या साहित्यकृती ह्या समकालीन असत नाहीत. कारण त्या वास्तवाचे चित्रण करत नाहीत.

१९४५ च्या पूर्वी किंवा नंतर सर्वच साहित्य समकालीन का होऊ शकत नाही ते आपण पाहिले. त्यानुसार जे समकालीन साहित्य होऊ शकते त्या साहित्याचा विचार आता आपण करणार आहोत. समकालीन साहित्यातील कथालेखनाचे स्वरूप पाहात असताना त्यामध्ये तीन प्रवृत्ती दृष्टीस येतात. ग्रामीण, नागर, दलित या तीन प्रवृत्ती मधून आपल्याला परत वेगवगळे विषय जन्माला आलेले दिसतात यामध्ये ग्रामीण आणि नागर परिसरातील राजकारण आहे, बुध्दिजीवी मध्यवर्गी व्यक्तींची अगतिकता आहे. दलितांच्या अनुभवास येणारी सामाजिक विषमता आहे.

' कथा ' ह्या वाङ्मयप्रकारात लोक प्रिय कथा लिहिणारे कथाकार असले तरी गांभीर्याने कथा लिहिणारे कथाकारही आहेत. आता आपण समकालीन कथा लिहिणाऱ्या लेखकांच्या कथांविषयी थोडक्यात आढावा घेवू त्यावरुन आपणाला समकालीन कथालेखनाचे स्वरूप लक्षात येईल.

### ❖ समकालीन ग्रामीण कथालेखन :-

समकालीन ग्रामीण कथालेखनाचे स्वरूप पाहत असताना ग्रामीण कथेचा आढावा घेतला तर असे दिसून येते की, ग्रामीण कथा लिहिली ती हरिभाऊ आपटे यांनी १८१८ ' काळ तर मोठ कठीण आला ' या कथेतून शेतकऱ्यांची स्थिती दाखवून दिली. परंतु या कथेचे क्षेत्र मर्यादित ठरले व या दोषामुळे कथेला नवीन क्षेत्र शोधण्याची गरज भासू लागली. त्याच वेळी ' खेड्याकडे चला ' हा गांधीजींचा मंत्र जोरात प्रसार पाऊ लागला होता. त्यामुळे लेखकांचे लक्ष खेड्याकडे वळले. ग्रामीण भागातील समस्या, जीवन, घडामोडी त्यांना जवळून दिसल्या व त्याचा आविष्कार कथेतून होऊ लागला.

१९३१ साली वि. स. सुखठणकर यांचा ' सह्याद्रीच्या पायथ्याशी ' हा कथासंग्रह प्रसिध्द झाला. त्यात त्यांनी गोमंतकीय जीवनातील अनुभव सांगितले. नंतर लक्ष्मणराव सरदेसाई यांनी ' कल्पवृक्षाच्या छायेत ', ' ढासळलेले बुरूज ' हे कथासंग्रह लिहून गोव्यातील निसर्गवर्णनासह गोव्यातील जीवनाचे चित्रण केले. श्री. म. माटे यांचा १९४५ साली ' उपेक्षितांचे अंतरंग ' हा कथासंग्रह प्रसिध्द झाला. माटे हाडाचे समाजसुधारक होते त्यामुळे त्यांनी प्रत्यक्ष पाहिलेल्या अनुभवातून आपली कथा साकारली आहे. ग. ल. ठोकळ यांनी ग्रामीण भागातील अज्ञान, परस्परातील वैर चित्रण केले.

र. वा. दिघे यांनी कोकणच्या पार्श्वभूमीवर आधारित अशा प्रसंगावर कथालेखन केले. त्यानंतर वामन चोरघडे यांनी वऱ्हाडी प्रांतातील ग्रामीण जीवनाचे चित्रण केले तर य. गो. जोशी यांनी वास्तव जीवनाचे चित्रण केले. या काळातील कथाही प्रादेशिक ग्रामीण कथा म्हणून प्रसिध्दीस आलेली दिसते. कारण या काळात ग्रामीण कथेतून प्रादेशिक वर्णन अधिक झालले आहे.

सुखठणकर, सरदेसाई, माटे यांच्या पासून ग्रामीण कथा सुरू झाली असली तरी ग्रामीण कथेचा आरंभ व्यंकटेश माडगूळकरांच्या पासून झालेला दिसतो. त्यांचा १९४६ मध्ये ' माणदेशी माणसं ' हा कथासंग्रह प्रसिध्द झाला. त्यांनी कथेवरील बंधने नाकारुन कथेचा स्वतंत्र प्रांत निर्माण केला. स्वत:ला आलेले अनुभव जसे आहे तसे मांडण्याचा प्रयत्न केला.

१९४५ नंतरच खऱ्या अर्थाने ग्रामीण साहित्य निर्माण होऊ लागले व एक महत्त्वाची नवी पिढी ग्रामीण साहित्यात उदयाला आली. माडगूळकरा नंतर शंकरराव खरात, शंकरराव पाटील, द. मा. मिरासदार सारखे लेखक उदयाला आले. पुढे १९६० नंतर रा. रं. बाराडे, उध्दव शेळके, आनंद यादव, चारुता सागर, सखा कलाल, महादेव मोरे सारखे महत्त्वाचे कथाकार जन्माला आले व त्यांच्या साहित्या बरोबर हा कालखंड समाकालीन ग्रामीण साहित्याचा कालखंड म्हणून ओळखला जावू लागला.

१०६० नंतरच्या समकालीन साहित्याच्या कालखंडात ग्रामीण जीवनाचे चित्रण करणारे इतर कथाकार म्हणजे भास्कर चंदनशिव, आनंद पाटील, बा. ग. केसकर, बाबाराव मुसळे, उत्तम बंडू तुपे इत्यादी यांच्या कथामधून स्वातंत्र्यानंतरच्या ग्रामीण जीवनातील परिवर्तन प्रामुख्याने दिसते व राजकारणाच्या चक्रात सापडलेल्या एकीकडे बागायतदारांच्या हरितक्रांतीने संपन्न झालेल्या आणि दुसरीकडे अज्ञान व दारिद्रय यांनी गांजलेल्या ग्रामीण भागाचे वास्तव दर्शन घडते.

वरील प्रमाणे ग्रामीण कथालेखनाचे स्वरूप असलेल दिसते. यातील १९४५ नंतर ज्या लेखकांनी आपल्या ग्रामीण कथेतून समकालीन कथालेखन केले अशा कथाकारांचा व कथांचा थोडक्यात आढावा घेवू.

व्यंकटेश माडगूळकरांचे ' माणदेशी माणसे ', ' गावकडच्या गोष्टी ', ' हस्ताचा पाऊस ', ' सीताराम एकनाथ ', ' काळी आई ', ' जांबळाचे दिवस ', ' उंबरठा', ' घरदार ', ' वारी ', ' डोहातील सावल्या ', ' गोष्टी घराकडील ' इत्यादी संग्रह प्रकाशित आहेत.

व्यंकटेश माडगूळकरांना ग्रामीण कथेचे आद्य प्रवर्तक मानतात. कारण ग्रामीण कथेचा आरंभ व्यंकटेश माडगूळकरांपासून झालेला दिसतो. त्यांनी कथा लिहिताना त्यातील व्यक्तिचित्रणे, परिसर, भाषा याचे वर्णन जसे आहे तसे केले. ' गावाकडच्या गोष्टी ' या संग्रहापासून ग्रामीण कथा त्यांनी सुरू केली. यात बहुतांशी व्यक्तीचित्रणेच रेखाटली आहेत. आपल्या गावात भेटलेल्या चित्र विचित्र व्यक्ती त्यांचे स्वभाव त्यातील विसंगती याचे अचूक चित्रण त्यांनी केले आहे. ' माणदेशी माणसे ' यात सोशीकपणा, वेदनेतही प्राप्त स्थिती गोड मानून राहण्याची अल्पसंतुष्ट वृत्ती त्यांनी रेखाटली. ' काळी आई ' ह्या कथेत निरवानिरव करताना शेतजमीन विकून टाकावी असे ठरवून बसलेले म्हातारे आप्पा शेवटच्या क्षणी विक्रीचा शब्द मागे घेतात. जमीन विकायची नाही असे ठरवतात. '' मी कसाई नाही, मी माझी जमीन विकणार नाही '' असे जमीन विकत घ्यायला आलेल्यांना बजावत. ' पाणी ' ह्या कथेत एक स्वाभिमानी स्त्री आहे. नवऱ्याला पाणी भरायला लावणाऱ्या मामलेदाराच्या बायकोच्या गालावर सणसणीत चपराक ठेवून देते. अशा प्रकारे त्यांच्या कथातील विशेष दिसून येतात. याविषयी गंगाधर गाडगीळांनी ' सत्यकथे ' च्या सप्टेंबर १९५५ च्या अंकात माडगूळकरांच्या कथेची वैशिष्टे सांगितलेली आहेत. त्यांच्या मते, '' माडगूळकरांच्या कथेत दु:खाच्या अनुभवाला प्राधान्य असते. हे दु:ख यातली पात्रे एकट्याने आणि मूकपणे सोसत असतात. माडगूळकरांचे लेखन सहज आणि स्वाभाविक असते. त्यात लेखकाचा ' स्व ' डोकावत नाही. माडगूळकर अनुभवाकडे अनुभव म्हणूनच पाहतात. त्याचे नैतिक मूल्यमापन ते करीत नाहीत. माडगूळकरांच्या कथेतील घटकांची रचना विरोधाच्या तत्त्वावर केलेली असते. माडगूळकरांनी माणदेशी बोलीचा केलेला वापरही स्वाभाविक असाच आहे. '' [३]

माडगूळकरांनी आपल्या कथा सजीव रूपात मांडलेल्या दिसून येतात. त्यांनी अनुभवनाला शब्दाचे रूप दिलेले आहे असेच कथा वाचताना वाटते. पात्रे सजीव होताना दिसतात. त्यांची भाषा ही

ग्रामीण आहे. परिसर ग्रामीण आहे. त्यांनी कथेला कोणत्याही तंत्रात बसवलेले नाही. जसे आहे, जसे दिसले तसेच त्या कथेत मांडले. म्हणूनच ते श्री. म. माटे पेक्षा वेगळे ठरले. कारण माटेंनी जरी अनुभवातून कथा लिहिल्या तरी सुधारणा करणे हा हेतू ठेवून कथा लिहिल्या. त्यामुळेच माटें पेक्षा माडगूळकरांची कथा ही सजीव भासते. तसेच ती समकालीन जीवनाचे चित्रण करताना दिसून येते.

रा. रं. बोराडे यांचे ' पेरणी ', ' मळणी ', ' बोळवण ' इ. कथासंग्रह प्रसिध्द आहेत.

रा. रं. बोराडेंनी मराठवाड्यातील ग्रामीण जीवनाचे चित्रण केलेले आहे. जीवनातील नात्यागोत्याचे भावबंध ती चांगल्या प्रकारे चित्रित करते. बोराडे स्वत:च्या मुलाखतीत आपल्या कथेविषयी म्हणातात की, '' ग्रामीण समाजातील ' नातीगोती ', विशेषत: ग्रामीण मराठी समाजातील स्त्रियांच्या जीवनातील विविध स्वरूपाची दु:खे स्वाभाविकपणे माझ्या कथांमधून आलेली आहेत. ''[४]

बोराडेंच्या कथेमध्ये वेगळेपण दिसून येते. ' कळा ' या कथेतून मुक्या जीवाच्या वेणांचा निसर्गाशी घातलेला मेळ तसेच ' भेग ' ही कथा मानसिक भावना व्यक्त करणारी आहे यातील वय झालेला नवरा आणि उफाड्याच्या वयातील त्यांची बायको यांच्यातील वासनात्मक संघर्षाचे चित्रण केले आहे. ' पौरष ' ही कथा शारीरिकदृष्टया पांगळ्या, परंतु पौरुषत्वाची आंतरिक रग असणाऱ्या शोषित मनाची शोकांतिका आहे. ' मळणी ', ' खेळ ', ' अभ्यास ', ' कोकरु ' सारख्या कथांतून खेड्यातील बालमन व त्याचे खेड्यातील विश्व याचे चित्रण करताना दिसून येते.

माडगूळकरांच्या प्रभावामुळे बोराडेंनी ग्रामीण जीवनातील दु:खांचे चित्रण केलेले दिसून येते. परंतु त्यांनी स्त्री पुरूषांच्या जीवनातील समस्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला त्यामुळे त्यांची कथा प्रभावी ठरली व वेगळी ठरली. उध्दव शेळके यांचा ' शिळान ', ' वानगी ' हे कथासंग्रह प्रसिध्द आहेत.

उध्दव शेळकेनी कथासंग्रहात वऱ्हाडातील ग्रामीण जीवन आलेले आहे. दारिद्रयाने गांजलेल्या माणसांच्या संसाराच्या कथा शेळक्यांनी रंगवलेल्या आहेत. त्यांच्या कथासंग्रहातील कथांचा विचार केला तर असे दिसते की, त्यांच्या ' लेकुरवाळी ', ' पावसाळा ', ' माय ', या कथेतून दारिद्रयामुळे होणारा भावनिक कोंडमारा दिसून येतो. तर स्त्रीच्या व्यथांचे चित्रण ' वैरीण ', ' ताटातूट ',

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

'घालमेल ', ' भाइरच ', ' कढ ' इ. कथेतून आलेले आहे. स्त्री बरोबर पुरूषांच्या व्यथांचे चित्रणही त्यांनी ' दुख ', ' पौरूष ' सारख्या कथेतून केलेले आहे.

शेळकेंच्या कथेविषयी चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात की, " कोणत्याही विशिष्ट विचार सरणीचा चष्मा न घालता शेळके यांनी उपेक्षित, पीडित व दरिद्री माणसाच्या व्यथांना वाणी दिली "[५] शेळकेंनी वऱ्हाडी सर्वसामान्य माणसाच्या जीवनातील दु:ख, वेदना, कष्ट, सोशिकपणा याचे चित्रण केलेले आहे. हे चित्रण करत असताना वऱ्हाडी बोलीभाषेचाही वापर केलेला दिसून येतो. माडगूळकरांनी मानदेशी माणसांच्या व्यथांचे चित्रण केले त्याचप्रमाणे उध्दव शेळकेंनी वऱ्हाडी माणसांच्या व्यथांचे चित्रण केलेले दिसून येते.

आनंद यादवांचे ' खळाळ ' , ' आदिताल ', ' उवरणी ', ' मातीखालची माती ' हे कथासंग्रह प्रसिध्द आहेत.

आनंद यादवांनी ग्रामीण शेतमजूरांची दु:खे रंगविण्याचा प्रयत्न केला आहे. खेड्यात राबणाऱ्याविषयीची तळमळ, दारिद्रयामुळे अन्नालाही महाग झालेल्या लोकांची भावनिक ओढाताण, शेतकऱ्यांच्या जीवनात येणारी नैसर्गिक व मानवनिर्मित संकटे, यांत्रिकीकरणामुळे झालेला भावनिक कोंडमारा यामुळे यादवांची कथा सकस बनते. त्यांच्या ' वरातीचा शालू ' सारख्या कथेतून माणसांच्या मनावरच्या तणावांचे चित्रण येते. तर ' भोवळ ' सारख्या कथेतून ग्रामीण भागातील बेकारीच्या समस्येचे चित्रण केलेले आहे.

आनंद यादवांनी प्रयत्नपूर्वक बोलीभाषेचा वापर केला त्यामुळे कथेच्या जिवंतपणाला आणखी बळ मिळाले. म. द. हातकणंगलेकरांनी यादवांच्या भाषा शैलीबाबत व कथेबाबत म्हटले आहे की, " यादवांचा ' खळाळ ' हा कथासंग्रह प्रसिध्द झाला आणि त्यातील ' मोट ', ' धुण ' यासारख्या कथातील भाषेच्या सुरावटीने मन हर्षभरीत झाले. त्यातल्या थंडगार खळाळल्या लावण्याने मनात पालवी फुटली. त्यांच्या या कथात कथारूप देताना सुरावटीच्या रचनेसारखी कथेची रचना करण्याचा त्यानी प्रयत्न केला आणि चिंतनशील निवेदनाची एक वेगळी बंदीश निर्माण केली. दु:खाची मूळ आर्तता ते भोगत असतानाच त्यांच्या चिंतनात वृत्ती बुडवून टाकल्यामुळे या आर्ततेला प्राप्त होणारे

नादमय सौंदर्य या बरोबरच भाषेच्या प्रतिमांच्या सुप्त लावण्यमयतेचा चाललेला शोध यामुळे यादव ग्रामीण कथेला आविष्काराचे एक अभिनव परिमाण देवून या कथेचे एक नवे घराणे निर्माण करीत आहेत असे लोभस दृष्य काही काळ दिसेल " [६] आनंद यादवांच्या कथेचा अभ्यास केल्यानंतर हातकणंगलेकरांचे हे मत यथार्थच आहे असे वाटते.

यादवांच्या कथेत ग्रामीण जीवनाचे सर्वांगीण चित्रण घडते. त्यांनी ग्रामीण जीवनातील सूक्ष्म बारकावे टिपलेले आहेत व ग्रामीण परिसरातील व्यक्तींच्या मनाचा वेध घेतलेला आहे.

चारूता सागर यांचा ' नागीण ' हा कथासंग्रह प्रसिध्द आहे.

चारूता सागरांचा हा कथासंग्रह उल्लेखनीय आहे. त्यात त्यांनी ग्रामीण जीवनाच्याही पलीकडचे, भटक्यांचे जीवन चित्रित केलेले आहे. त्यांच्या कथांनी वाचकांचे आणि समीक्षकांचे लक्ष वेधून घेतले. त्यांची ' नागीण ' ही एक उत्कृष्ट कथा आहे. नागिणीसंबंधी ग्रामीण भागात प्रचलित असणाऱ्या रूढ समजुतीच्या आधारे प्रेम आणि सूड यांचे चित्रण केले आहे. मानव आणि प्राणी यांच्यातील सुखदु:ख कसे समान असते याचेही दर्शन या कथेतून घडते. चारुता सागरांनी डोंबारी, कोल्हाटी,जोगतिणी यांच्यावर कथा लिहिल्या. ' दर्शन ' कथेतील पुतळाबाईची व्यक्तिरेखा ही पुऱ्या ताकदीनिशी त्यांनी उभी केली आहे. ' ढोलग ' ही कथा डोंबाऱ्याच्या जीवनावर आधारित आहे. तर ' दावं ', ' म्हस ', ' भूक ' आणि ' राखण ' या कथा शेतकरी जीवनातील व्यथा, वेदना आणि स्वप्नांना प्रकट करतात. मांग, गारूडी, पारधी अशा भटकणाऱ्या जमाती, आर्थिक आणि सामाजिक दृष्टीने त्यांचे होणारे शोषण हा त्यांच्या कथेतील भाग आहे. यासंदर्भात म. द. हातकणंगलेकर म्हणतात की, " या जीवनाची इतक्या जाणिवेने व जिव्हाळ्याने मराठी वाचकांना कोणी ओळख करुन दिली नव्हती " [७] चारूता सागरांनी अत्यंत सजीवपणे भटक्या जमातीचे चित्रण केलेले आहे. त्यांचा अनुभव हा शब्द रूपाने आपल्या समोर आल्यासारखा वाटतो व त्यांनी भाषा सुध्दा अत्यंत साधी सोपी वापरली आहे. त्यामुळे कथेला गती आहे. पात्रांच्या वेदना वाचकांच्या हृदयाला भिडवायचे सामर्थ्य त्यांच्या भाषेत आहे.

चारूता सागरांच्या कथांचे वाचन केल्यानंतर त्या माडगूळकर किंवा यादवांपेक्षा वेगळा ठसा उमटवताना दिसतात. त्यांनी भटक्या जमातीचे केलेले चित्रण हे अत्यंत सजीव वाटते. भाषा साधी असल्यामुळे कथा समजण्यास कोणताही अडथळा येत नाही.

सखा कलाल यांचे ' ढग ' , ' सांज ' हे कथसंग्रह प्रसिध्द आहेत.

कलालांच्या या कथासंग्रहात ग्रामीण जीवनातील दु:खाचे चित्रण दिसून येते. सरल, साध्या पध्दतीने कथातून समकालीन जीवनाचे दर्शन घडते. त्यांनी कथेत लक्ष वेधण्यासाठी लेखनाचे प्रयोग किंवा शैलीतला वेगळेपणा जाणीवपूर्वक आंगिकारलेला नाही. त्यांच्या लेखनाबद्दल म. द. हातकणंगलेकरांनी म्हटले आहे. " भडक, नाट्यमय, झगझगीत अगर जळजळीत असे त्यांच्या कथालेखनाचे स्वरूप नाही. ते अत्यंत सौम्य, मंद, तरल, तलम असे आहे " [८]

त्यांच्या कथेतील माणसांची दु:खे अशी आहेत की वरवर पाहिले तर दिसत नाहीत. पण आतून मात्र ती शरीर पोखरून सोडतात. ' ढग ' या कथेतील रामा अस्वस्थ आहे. त्याला काय होत आहे हे त्याला स्वत:लाही कळत नाही. ' बळी ' या कथेत लग्न न झालेल्या तरुण मुलीला दिवस गेल्याने आई-वडील काळजीत चूर आहेत. तर ' सांज ' मधल्या कथासंग्रहातील ' दु:ख ' या कथेत अकाली गेलेल्या मुलामुळे म्हातारीची झालेली अवस्था हृदयाला पीळ पाडणारी आहे. ' भोग ' सारखी कथा मूल न होणे याचे दु:ख प्रकट करते. ' हिरवी काच ' या कथेत लहान मुलांचे भावविश्व रेखाटले आहे.

कलालांनी ग्रामीण माणसांच्या भाव-भावनांचे, त्यांच्या मनावरील ताण-तणावाचे आणि गुंतागुंतीचे चित्रण केले आहे.

महादेव मोरे यांचे ' दवना ', ' फर्री ', ' चित्ताक ' हे कथासंग्रह प्रसिध्द आहेत.

महादेव मोरे यांचे कथाविश्व पूर्वसूरींच्या ग्रामीण कथालेखकापेक्षा वेगळे आहे. त्यांनी निपाणीच्या आसपासचे तंबाखूच्या धंद्यातले कामगार मालक, एजंट आणि या धंदयाशी संबंधीत असलेले इतर यांच्या आयुष्याची कर्मकहाणी आपल्या कथांतून प्रथमच मांडलेली दिसून येते. ग्रामीण भागातील सुशिक्षित बेकार तरुण आणि पोटासाठी भरकटत जाणाऱ्या स्त्रियांचे चित्रण ते करतात.

' गिधाड ' या कथेत दुष्काळच्या भीषण खाईत सापडलेल्या दरिद्री मजुरांच्या कुटुंबाचे चित्रण आहे. ' काळोखातील खुणा ' या कथेत स्त्रीच्या दु:खाचे एक वेगळे दर्शन आपल्याला घडते. मोरे यांच्या कथेसंबंधी आनंद यादव म्हणतात, " महादेव मोरे यांची कथा ग्रामीण जीवनातील विविध स्तर, विशेषत: खालचे स्तर हाताळण्याचा प्रयत्न करते; त्यांची बुध्दी त्यांच्या पिढीतील इतर लेखकांच्या तुलनेने अधिक तरल आणि वृत्ती उपक्रमशील आहे. कथेचे विविध घाट शोधण्याचा ते त्यांच्या परीने सतत प्रयत्न करतात. पण त्यांच्या बहुसंख्य कथा वाचल्यानंतर असे जाणवते की, त्यांच्या प्रयत्नात विचारपूर्वकता कमी आहे. मराठी तील नागर व ग्रामीण लेखकांच्या विविध कथा वाचून त्यांच्या घाटांना अनुसरुन आपली कथा त्यांच्यासारखी करावी अशा केवळ तात्कालिक प्रेरणेने ते आपल्या अनेक कथा लिहीत असावे. या प्रेरणेने ' स्वतंत्र जाणीव ' प्रत्यायाला येत नाही. त्यामुळे त्यांच्या कथारूपांचा परिणाम मनावर विस्कळीत होतो. भाषाशैलीत ते स्वतंत्रपणे रमताना दिसतात. एकूण कथेच्या संदर्भात एखाद्या घटनेला व संवादाला काय स्थान आहे. याचे भान त्यांना पुष्कळवेळा नसते. कित्येकवेळा प्रेमभावना आणि लैंगिक भावना यांच्या आहारी जाऊन आपली कथा वास्तवापासून वंचित करुन भडक, रोमँटिक करण्याचा प्रयत्न करतात. या मोहातून महादेव मोरे जर सुटले तर उत्तम प्रकारचे भाषासाधन लाभलेला, प्रयोगशीलतेवर प्रेम करणारा एक बुध्दिमान लेखक मराठी ग्रामीण साहित्याला मिळेल असे वाटते." [९]

मोऱ्यांच्या कथेतून गावातील जीवनाचे चित्रण येत नाही. त्यांच्या कथेतील माणसे मुळची ग्रामीण आहेत, परंतु जगण्यासाठी निपाणीसारख्या तालुक्याच्या गावी आलेली आहे. हे लक्षात ठेवावे लागते. ग्रामीण भाषेचा वापर वाखाणण्यासारखा आहे. समाजातील कष्टकरी, श्रमिक स्त्री-पुरूषांच्या जीवनाची दु:खे आपल्या कथातून मांडतात.

१९४५ पासून १९६० नंतरच्या ग्रामीण कथेमध्ये समकालीन जीवनाचे दर्शन घडविण्याचा प्रयत्न कथाकरांनी केलेला आहे हे वरील विवेचनावरुन आपल्याला समजते. आजची ग्रामीण कथा ही कशा प्रकारे समकालीन विचार, जाणिवा, मते व्यक्त करते ते दिसून येते. म्हणूनच पूर्वीच्या ग्रामीण कथेपेक्षा १९६० नंतरची ग्रामीण कथा ही आजच्या काळातील ग्रामीण जीवनाचे दर्शन घडवते.

सारांश, हरिभाऊंच्या ' काळ तर मोठा कठीण आला ' या कथेपासून ग्रामीण कथेची सुरुवात झाली. त्यात शेतकऱ्यांची दुर्दशा त्यांनी रंगविली. श्री. सुखठणकर, सरदेसाई यांनी गोमंतकाचा भाग रंगवला आहे. तर श्री. म. माटेनी दलितवर्गातील उपेक्षीतांचे अंतरंग अकलून दाखवले आहेत. त्यांचा समाजशास्त्रीय दृष्टीकोन त्यात व्यक्त होतो. त्यानंतर र. वा. दिघे, ग. ल. ठोकळ, वामन चोरघडे यांनीही खेडूतांचे जीवन रेखाटण्याचा प्रयत्न केला.

ग्रामीण कथेची खऱ्या अर्थाने सुरुवात झाली ती माडगूळकरांपासून त्यांनी मानदेशी माणसांचे जीवन चित्रित केले. माडगूळकरांच्या नंतर शंकरराव खरात, शंकरराव पाटील, द. मा. मिरासदार साराखे लेखक होऊन गेले. त्यानंतर रा. रं. बोराडे यांनी आपल्या ' पेरणी ' कथासंग्रहात नाव कमावले. त्यांच्या कथेत व्यथा, वेदना आहे. खेड्यातल्या स्त्री-पुरूषांच्या भावजीवनातील समस्यांचा गुंतागुंतींचा शोध आहे. उध्दव शेळके यांनीही ' शिळान ' व ' वानगी ' या कथासंग्रहातील कथांमध्ये वऱ्हाडातील लोकांचे चित्रण केले. तर आनंद यादवांनी आपल्या ' खळाळ ' मध्ये दु:खाच्या ओझ्याने वाकलेल्या दरिद्री शेतकरी व मजुराचे चित्रण केले आहे. ' नागीण ' या एकाच कथासंग्रहामध्ये ग्रामीण कथाकार म्हणून प्रथीत यश मिळवले ते चारूता सागरांनी. अत्यंत वास्तववादी अशा त्यांच्या कथा ग्रामीण भाषेचा ढंगदारपणा घेऊन आल्या आहेत. तर सखा कलालांनी ग्रामीण जीवनातील दु:ख दाखवण्याचा प्रयत्न केला. या सर्व कथांचा विचार केला तर त्यांचे विचार, जाणिवा, मते वेगवेगळी असली तरी या कथा समकालीन आहेत. समकालीन संज्ञेशी संवाद साधणाऱ्या आहेत.

ग्रामीण कथालेखनाचे स्वरूप पाहिल्या नंतर आता आपण समकालीन नागर कथालेखनाचा आढवा आपण पाहू.

### ❖ समकालीन नागर कथालेखन :-

हरिभाऊंनी कथेची सुरूवात केली व कालखंडानुरूप कथा पुढे सरकली. नागर कथालेखन हे १९४५ नंतर अधिक प्रमाणात झालेले दिसते किंवा नागर जीवनाचे चित्रण हे १९४५ च्या नंतर चांगल्या प्रकारे मांडले गेले. कारण १९४५ च्या आधीची कथा ही प्रेमात अडकलेली होती. उदा. फडके-खांडेकर युग त्यानंतर मात्र काही घटना अशा घडल्या की कथेमध्ये बदल घडून आला. याच काळात

दुसरे महायुध्द होऊन अपरिमित मानवहानी व वित्तहानी झाली होती. मानवाचा मानवतेवरील विश्वास उडाला होता. यंत्रयुगामुळे लोकांचे रोजगार जाऊन बेकारी वाढली होती. त्यामुळे गांजलेला माणूस गुन्हेगारीकडे वळू पाहत होता. मनुष्य यंत्रवत झाला होता. या भावनाहीन जगात पैसा हेच लोकांचे सर्वस्व झाले होते. याच काळात फ्रॉईड मानसशास्त्रज्ञाने मनोविश्लेषनवाद मांडला होता. परीणामी यातून आलेली मराठी कथा वेगळयाच विश्वाचे प्रतिनिधित्व करु लागली आजपर्यंत मराठी कथा उच्चभ्रू लोकांच्या जीवनाचे वर्णन करत होती. परंतु नवकथा मात्र मध्यम वर्गियांच्या किडलेल्या मनाचे विश्व साकारु लागली. मुंबईतील माळीत राहणाऱ्या सडलेल्या मनोवृत्तीच्या लोकांचे जीवन ती रंगवू लागली. आघाडीचे नवकथाकार म्हणून तिघांचे नाव घेतले जाऊ लागले. गोखले, गाडगीळ व भावे.

गंगाधर गाडगीळांनी मध्यम वर्गीयांच्या चाळ संस्कृतीचे वर्णन केले. या माणसाची कोती मनोवृत्ती दुसऱ्यांना दु:ख देण्यात होणारा असुरी आनंद याचे वर्णन केले. अरविंद गोखले यांनी ' कोकराची कथा लिहून एका वेगळ्या भावविश्वाचे दर्शन घडवले. माणसांच्या मनातील अंतर्गत संघर्ष त्यांच्या सूक्ष्म भावना गोखलेंनी रंगविल्या यातूनच संज्ञाप्रवाह पध्दती सुरू झाली. पु. भा. भावेंनी स्त्रीयांच्या, कुमारीकांच्या, विधवांच्या दु:खाचे चित्रण आपल्या कथेतून केले. त्यानंतर जी. ए. कुलकर्णी यांनी अस्तित्ववादी विचारसरणीच्या कथा लिहिल्या. परंतु या कथा तर सामान्यमाणसांस अनाकलनीय आहेत. खानोलकरांनी आपल्या कथेतून भावानुभाचे चित्रण केले.

यानंतर विजय तेंडूलकर, दिलीप चित्रे, ज्ञानेश्वर नाडकर्णी, शरदचंद चिग्रमुले, विद्याधर पुंडलिक, श्री. दा. पानवलकर, जयवंत दळवी, विजय तेंडूलकर, अच्युत बर्वे, ए. वी. जोशी, रत्नाकर मतकरी, ह. मो. मराठे, वसंत फेणे, पु. शि. रेगे इ. कथाकारांचे लेखन नियतकालिकांतून प्रकाशित होत होते. परंतु नंतर सत्तरच्या दशकात काही नवीन कथाकारांचा उदय झाला.

आनंद विनायक जातेगावकर, विलास सारंग, अनिल डांगे, श्याम मनोहर, भारत सासणे, राजेंद्र बनहट्टी इ. लेखकांचे लिखाण झाले ते सर्व नागर जीवनाचे चित्रण करत होते. परंतु समकालीन जीवनाचे चित्रण १९६० नंतर अधिक प्रमाणात झालेले दिसते. समकालीन नागर जीवनाचे चित्रण करणाऱ्या कथाकारांच्या कथांचा आपण थोडक्यात आढावा घेवू.

जी. ए. कुलकर्णींचा ' पारवा ', ' हिरवे रावे ', ' रक्तचंदन ', ' काजळमाया ', ' रमलखुणा ', ' सांजशकुन ', ' पिंगळावेळ ' हे कथासंग्रह प्रकाशित आहेत.

जी. ए. कथां ही आजच्या म्हणजे समकालीन नागर कथावाङ्मयातील शिखरावरची कथा म्हणावी लागेल. जी. ए. च्या कथांतून संपूर्ण जीवनाचेच चित्र दिसून येते. त्यांची कथा संपन्नतेने, विविधतेने, नटलेली आहे. जी. ए. च्या कथांचा आवाका मोठा आहे. त्यांची पात्रे वर्तमान-काळात वावरतात पण त्यांना न विसरता येणारा भूतकाळ असतो. ' पुरूष ' मधील निकम गतायुष्यात काहींनी त्याच्या झोळीत घातलेले दृष्टपणाचे दान विसरू शकत नाही. म्हणून तेच दुसऱ्याच्या झोळीत टाकीत परतफेडीच्या इर्षेने तो जगतो. ' पराभव ' मधील रुक्मिणीच्या जीवनात भूतकाळातील आठवणीचे विष कायम भिनलेले आहे. जी. ए. च्या ' माणूस नावाचा बेटा ', ' तुती ', ' बळी ', ' सोडवण ', ' मुखवटा ', ' राधी ' अशा कितीतरी कथातून जीवनाची अर्थशून्यता प्रकट होते. तसेच जी. ए. च्या जगात सर्वमान्य नात्यांनाही अर्थ नाही. त्यांचे संबंध आंतड्याचे नसतात. व्यवहाराने, शरीरधर्माने ती एकत्र येतात. ' पराभव ' मधील रुक्मिणी आपल्या आईची वैरीण असते. ' शॅलॉट ' मधील काशीचा बाप तिचा जन्मभर तिरस्कार करतो. ' तक्षक ' मधील अण्णाराव आपल्या तिन्ही मुलांची परवड उघड्या डोळयांनी पाहतात. ' तुती ' मधील सुमीचे आईवडील तिला निर्दय बिजवराच्या आयुष्यात ढकलतात. ' बाधा ' मध्ये आपल्या वेडसर अर्धवट बायकोच्या कचाट्यातून गोपाळराव सुटण्याची धडपड करतात. ' अखेरचा दिवस ' मधील सावित्रीबाई पैशांसाठी आपल्या नवऱ्यालाच विहिरीत ढकलून देते.

जी. ए. च्या कथेविषयी इंदूमती शेवडे म्हणतात की, " जी. एं. च्या कथांतील प्रखर आत्मप्रत्ययाचा ठसा आपल्यावर एकदम पडतो. संपन्न अनुभूती, उत्कट आत्मप्रत्यय, विशिष्ट जीवन दृष्टीने त्या अनुभवांना दिलेली अर्थपूर्णता, जोडीला विचार , स्मृती सहचारी कल्पना, अनेक संदर्भ, सूचनाशक्ती यामुळे जी. ए. च्या कथांतील अनुभवाचे पोत अतिशय घन व बळकट बनते. विशिष्ट जीवनधारणेमुळे आलेली व्यापक दृष्टीकक्षा, समदृष्टी व वस्तुनिष्ठता यामुळे जी.ए. च्या कथांची वीण घट्ट, नवी व अर्थपूर्ण अशी घातली जाते. " [१०]

जी. ए. कथेमध्ये व्यक्तीला किंवा व्यक्तीच्या परिस्थितीला महत्त्व देत नाहीत तर जीवनाचे प्रश्न, जीवनाविषयीचे चिंतनाला प्राधान्य देतात. ते कधी परिचित वास्तवाचे तर कधी अद्‌भुततेचे चित्रण करतात. जीएंची कथा लिहिण्याची एक विशिष्ट भाषा आहे. त्यांनी कथानिवेदनात भाषेचा कलात्मक उपयोग केलेला आहे.

दिलीप पुरूषोत्तम चित्रे यांचा ' ऑर्फियस ' हा कथासंग्रह प्रसिध्द आहे.

चित्रे कविते प्रमाणे कथेतही अतिवास्तववादी दृष्टिकोण व्यक्त करतात. त्यांच्या कथांतून व्यक्त झालेला अस्तित्वानुभव देहाच्या माध्यमातून घेतलेला आहे. कथांतील नायक सामान्य आहेत पण व्यक्तिकेंद्री आहेत. ' केसाळ काळेभोर पिल्लू ', ' तिडीक तिरडी अनंतकाळ ', ' व्हायरस ' सारख्या कथांमध्ये नायकांच्या जीवनात स्त्री-पुरूष संबंधाला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. चित्र्यांची सर्वच पात्रे ' लैंगिक ' संबंधातूनच अस्तित्वाचा शोध घेतात. परंतु ' ऑर्फियस ' ही कथा ग्रीक पुराणातील ऑर्फियसच्या गोष्टीवर आधारलेली आहे. तर ' प्रतिभावंताचं मरण ' यात माणूस प्रतिभावंत असला तरी त्याला आपले भवितव्य घडवता येत नाही. ' जाराचं स्वागत ' मध्ये माणसांना स्वेच्छा फारशी नसतेच नियतीच त्यांचे जीवन घडवते याचे चित्रण आहे. चित्रेंनी ' स्वत:च्या लेखनासंबंधीचे विचार ' ' सत्यकथे ' च्या १९६७ च्या अंकात मांडले आहेत. ते म्हणतात, " अर्थात लेखनावर खरा संस्कार एकच असतो ...... तो म्हणजे समकालीन जीवनाचा आणि स्वत:ला येणाऱ्या अनुभवांचा ...... या सर्वांचाच मनावर ठसा पडतानाच त्याच्यावर स्वत:च्या उद्‌देशांचे व प्रेरणांचेही तत्कळ घाट उमटत असतात." [११]

चित्रें आपल्या कथांतून माणसाचा एकाकीपणा, चित्रित करतात. तशीच ती स्त्री-पुरूष संबंधातील गूढता उकलन्याचा प्रयत्न करते. त्यांच्या कथेतील पात्रांना मृत्यूची जाणीव आहे. माणूस नशवर आहे याचे भान आहे. परंतु मृत्यूवर मात करण्याचा प्रयत्न करणारी जीवनप्रेरणा सुध्दा आढळते. भाषेचा वापर अत्यंत जागरुक राहून करतात. चित्रेंची कथा आपले वेगळेपण दाखवते. समकालीन जीवनाचे चित्रण करते.

चिं. त्र्यं. खानोलकर यांचे ' सनई ', ' राखी पाखरू ', ' बाप ' हे कथासंग्रह प्रसिध्द आहेत.

खानोलकरांच्या कथांमधून माणूस आणि त्याच्या भोवतीचे विश्व यांच्यातले विविधांगी विरोधी ताण, माणसांचा स्वभाव, शरीराबरोबर येणाऱ्या वासना आणि विकार या तणावातून निर्माण होणाऱ्या शोकात्मिका यांचे चित्रण येते. तसेच मुलांच्या मन:सृष्टीचे चित्रही येते.

' सनई ', ' रेघा ', ' रामू ' आणि त्याचा बाप ' रेघा ' या लहान मुलांच्या अनुभवाभोवती या कथा गुंफलेल्या आहेत. ' सत्य ', ' रेघा ', ' हाडकुळा व गलेलठ्ठ ' यातील माणसे उत्कट अनुभव घेतात पण अलिप्त व नामानिराळी राहतात. भावनेने कुणात गुंतत नाहीत. कित्येकदा ही माणसे चमत्कारिकपणे वागतात. खानोलकरांच्या कथेतील पात्रांच्या जीवनाविषयी इंदूमती शेवडे म्हणतात, " मानवी जीवनातील विसंगती व मानवी स्वभावातील विक्षिप्तपणा खानोलकर अशा रीतीने दाखवतात "[१२]

खानोलकरांच्या कथांमधील पात्रे ही विक्षिप्त वाटतात कारण दुसऱ्या व्यक्तीशी बांधले गेल्याने त्यांना दु:ख भोगावे लागते. दु:ख हे मानवी जीवनात नेहमीच असणार, त्यापासून आपल्याला सुटता येत नाही. पळ काढता येत नाही अशी जाणीव कथांमधून व्यक्त होते. या कथांमध्ये, दु:खांची विविधता असली तरी मानवी अस्तित्वाविषयी चिंतन आढळत नाही. यामुळे - जी. एं. च्या व चित्रें पेक्षा खानोलकरांची कथा प्रभावी ठरत नाही.

आनंद विनायक जातेगावकर यांचा ' मुखवटे ' कथासंग्रह प्रसिध्द आहे.

जातोगावकरांच्या कथेतील आशयातून आजच्या काळातल्या समस्या व्यक्त झालेल्या आहेत. शिवाय भोवतीची सामाजिक, राजकीय स्थिती, मध्यमवर्गीय माणसाचे एकाकीपण, कुटुंबव्यवस्थेचे विघटन, मूल्यांचा ऱ्हास अशी नवी आशयसूत्रेही कथामधून आलेली आहेत.

' श्रीनिवासचं सोळवं वर्ष ' या कथेत आत्मविश्वास गमावल्यामुळे आत्महत्येस उद्युक्त झालेल्या एका अबोल, एकाकी मुलाच्या मन:स्थितीची चित्रण आहे. तर ' रान ' मध्ये दौऱ्यावर बापाबरोबर गेलेल्या व रानात वाट विसरुन प्राण सोडणाऱ्या लहान मुलाच्या भयाकुल मनाचे वर्णन आहे.

तर ' मुखवटे ' मध्ये पिढ्यानपिढ्या घराण्यातील सवाष्णींनी रंगवून बसवलेल्या गौरींचे मुखवटे व त्या मागचा उद्देश याचे चित्रण आहे. ' घर ' मधील नर्मदाबाईंनी वास्तविक कधीच ' घर ' नसते.

जातेगावकर लहान मुलाचे मन असो, सोळा वर्षांच्या मुलाचे असो, म्हाताऱ्या स्त्रीचे असो त्याचे वर्णन हुबेहूब करतात. त्यांचे अनुभव एकरूप होऊन लिहितात. त्यांची कथा ही हरिभाऊंच्या कथेशी एकरूप असल्यासारखी वाटते. स्त्री जीवनावर आधारित कथांचे चित्रण लक्षपूर्वक केले आहे. त्यांच्या कथेविषयी इंदूमती शेवडे म्हणतात की, " या कथांचे कौटुंबिक विषय, त्यांतील घरगुती वातावरण, स्त्रीच्या नजरेने टिपावा असा हरिभाऊंनाही मागे टाकणारा बारीकसारीक तपशील व गोष्टी वेल्हाळपणा, यांसह ही कथा एखाद्या कसलेल्या कलावंताच्या आत्मविश्वाने आरामशीरपणे व ऐसपैसपणे अवतरत जाते." [१३]

श्याम मनोहर यांचे ' आणि बाकीचे सगळे ' व ' बिनमौजेची गोष्ट ' हे कथासंग्रह प्रसिध्द आहेत.

श्याम मनोहरच्या कथेत व्यक्ती आणि कुटुंब, व्यक्ती आणि समूह, व्यक्ती आणि विविध गरजांसाठी उत्पन्न झालेल्या समाजिक संस्था यांच्यातील परस्परसंबंध याचे चित्रण येते. श्याम मनोहर यांची कथानिवेदनाची पध्दती वास्तववादी, अतिवास्तववादी आहे. मनोहरांच्या ' कॉंपिटीशन ', ' रिलेशनशिप ', ' घोळक्यात पराभव ', ' क्रौर्य ' या कथांत अतिवास्तववाद दिसून येतो. 'रिलेशनशिप' सारखी कथा माणसामाणसातील रिलेशनशिप मध्ये जाणवणारी कृतिमता व जीवनाची अर्थहीनता दाखवते.

श्याम मनोहरांच्या कथेचा प्रमुख विषय व्यक्तिगत मी आणि समाजात पार पाडावी लागणारी भूमिका यासंदर्भातील प्रश्न हा असतो. यांच्या कथा मानवी अस्तित्वाचा शोध घेतात. यांची कथा समकालीन कथेशी जुळणारी आहे.

ह्या कथासंग्रहातील कथांमधून मानवी अस्तित्व विषयक प्रश्नांचा वेध घेतलेला आहे. निसर्ग, समाज आणि यंत्र या तीन गोष्टींनी माणसाच्या अस्तित्वाला जखडलेले आहे व यातून तो सुटण्याचा

प्रयत्न करतो आहे. त्याची ती धडपड आणि सुटका किंवा वैशिष्टपूर्ण आहे. या कथेत नेहमीची परिचयाची सत्यनारायणाची कथा आहे पण तिला एक वेगळा अर्थ दिला. नारायणाला पूर्णपणे शरण जाणारा साधुवाणी येथे नाही. नारायणाने दिलेल्या प्रत्येक दु:खाला, क्लेशाला स्वीकारणारा आधुनिक साधुवाणी येथे आहे. ईश्वराने दिलेल्या सर्वच गोष्टी स्वीकारणारा हा आधुनिक मानव ईश्वराहूनही थोर होऊन जातो. त्याचप्रमाणे ' अमीषा ', ' पांघरुण ' सारख्या कथा नव्या अपेक्षा निर्माण करतात. श्याम मनोहर सारखेच अनिल डांगे आपल्या कथेतून मानवी अस्तित्वाचा शोध घेतात.

विलास सारंग यांचा ' सोलेदाद ' हा कथासंग्रह प्रसिध्द आहे.

सारंगाची कथा ही समकालीन असलेली व पूर्वकाळापेक्षा वेगळी वाटणारी आहे. माणसाचे मूलभूत एकटेपण आणि त्याचे इतर माणसांशी असलेले नाते याचा शोध घेणारी कथा आहे. ही वैशिष्ट्ये दिसून येणारी त्यांची ' इतिहास आमच्या बाजूला आहे ' ही कथा दिसून येते. यात पिंजऱ्यातल्या पोपटाला आरशात त्याचे प्रतिबिंब दाखवणे आणि त्याचवेळी टेपरेकॉर्डरच्या साह्याने त्याचे ओरडणे ऐकवणे एकाकी असलेल्या त्या पोपटाला दुसऱ्या पोपटाचा भास होऊन त्याला भेटणयासाठी तो जिवाचा आकांत करतो आणि मरतो. ह्या कथेतली इतिहाससंशोधक आणि त्यांचा शिष्य हे दोघेही एकाकी जीवन घालवणारे असतात. एकटेपणातली क्रूरता ह्या सबंध कथेतून व्यक्त होतो. तसेच ' सोलेदाद ' म्हणजे एक किंवा एकटा ह्या कथेतील माणसाला कुणा सोलेदादची पत्रे येत असतात. पण तो सोलेदाद कोण आणि याला आता पत्रे का पाठवतो आहे, काही कळत नाही. परंतु सोलेदाद एकटेपणाशी सामना करीत आहे हे कळते.

सारंगानी आपल्या कथांतून माणूस आज किती एकटा झालेला आहे व तो एकटेपणा घालवण्यासाठी माणसांशी संबंध जोडण्याचा प्रयत्न करतो आहे. परंतु ह्या संबंधावर संशय, अविश्वास, गैरसमज, स्वार्थ यांची छाया पडते आणि हे संबंध केव्हाही नष्ट होऊ शकतात याचे चित्रण प्रभाविपणे केले आहे. सारंग परिचित पण दुर्लक्षित अनुभवांवर लक्ष केंद्रित करतात व कथा लिहितात. डांगे व मनोहरांसारखे यांनीही मानवी अस्तित्वाचा शोध घेतलेला दिसून येतो.

भारत सासणे यांचा ' जॉन आणि अंजिरी पक्षी ', ' कॅम्प आणि बॉबीचं दु:ख ', ' चिरदाह ' हे कथासंग्रह प्रसिध्द आहेत.

भारत सासणे यांच्या ' जॉन आणि अंजिरी पक्षी ' मध्ये ७३ ते ७८ मधल्या कथा समाविष्ट केलेल्या आहेत. जीवनातील दु:खाचे, नियतीच्या विपरिततेचे चित्रण ते करतात. तसेच मानवी मनातील रितेपणा, दोन संस्कृतीमधला संघर्ष याचेही चित्रण त्यांच्या कथातून दिसून येते. ही सर्व वैशिष्टये पुढील कथेत नियतीच्या क्रूर खेळाचे चित्रण येते. ' मनातला मोर ' मध्ये गावातल्या अंधविश्वासामुळे मनातला नैसर्गिक संघर्ष ' परदु:खशीतल ' या कथेत चित्रित होतो. वास्तववाद हे भारत सासणे यांच्या कथांचे मुख्य वैशिष्टय आहे. समकालीन जीवनाचे चित्रण त्यांच्या कथांतून आलेले आहे.

सारांश, हरिभाऊंपासून कथेची सुरुवात झाली असली तरी कालखंडानुरूप ती पुढे सरकली व नागर जीवनाचे दर्शन गाडगीळ, गोखले, भावे सारख्या कथाकारांनी घडवले. अनेक अंगांनी कथेचा विकास त्यांनी केला व सामाजिक, मानसिक वास्तवाचा वेध आपल्या कथांत घेतला. १९९० नंतर मात्र समकालीन जीवनाचे दर्शन खऱ्या अर्थाने घडले. जी. ए. कुलकर्णी, चित्रे, खानोलकर हे कथाकार नव्या प्रेरणा घेवून लिहिताना दिसतात. वास्तवाच्या शोध घेणाऱ्या कथा दिसून येतात. जी. ए. यांच्या मानाने चित्रे-खानोलकरांचे कथालेखन अल्प आहे. परंतु चित्र्यांनी थोड्याच कथा लिहिल्या पण ह्या कथांनी वाचकाचं लक्ष वेधले आहे.

आधुनिक जवीनातील रितेपणा, भकासपणा, मानवी अस्तित्वाचे विडंबन व विक्षिप्तपणा चित्रित करणारे जातेगावकर, विलास सारंग, अनिल डांगे, श्याम मनोहर, भारत सासणे सारखे लेखक आहेत. त्यांनी प्रामुख्याने आपल्या कथांतून जीवनाच्या अर्थशून्यतेची वैफल्याची व माणसाच्या एकलेपणाची भावना, साहित्यातील असामाजिक व व्यक्तिकेंद्री वृत्ती व जीवनातील वास्तवाचे चित्रण करण्याच्या हेतूने कुरूप, ओंगळ, अश्लील गोष्टींवर भर देण्याची प्रवृत्तीचे चित्रण केले आहे. यातील सर्व आशयसूत्रे समकालीन असलेली दिसतात म्हणून १९६० नंतरची नागर कथा समकालीन आहे.

समकालीन कथालेखनाचे स्वरूप पाहात असताना त्याच्या ग्रामीण व नागर या दोन प्रवृत्ती आपण पाहिल्या. त्याबरोबर त्याची दलित कथालेखन ही प्रवृत्ती आता आपण पाहणार आहोत.

### ❖ समकालीन दलित कथालेखन :-

१९४० नंतर दलित कथालेखकांनीही कथा निर्मिती करण्यास सुरुवात केलेली आढळते. दलित साहित्यामधून स्वतंत्र वाङ्मय विभाग १९६० च्या सुमारास निर्माण झालेला दिसतो. या काळात दलित वर्गात जन्म घेतलेल्या लेखकांनी कथालेखन केलेले आढळते. १९६० नंतरच्या कथेत दलितकथा हा स्वतंत्र कथाप्रकार मानण्यात येऊ लागला. १९६० पूर्वीच्या कालखंडाचे प्रतिनिधी म्हणून आण्णाभाऊ साठे, ना. रा. शेंडे, बंधुमाधव, शंकरराव खरात हे लेखक दलित कथा लिहीत होते.

दलित कथा ह्या प्रामुख्याने अस्पृश्य जीवनाचे चित्रण करणाऱ्या परंपरा, रूढी, अंधश्रध्दा, वर्णव्यवस्था इ. मुळे दलितांच्या जीवनावर झालेला परिणाम, आंतरजातीय प्रेमविवाह, हिंदू धर्मातील अनिष्ट चालीबद्दल तिरस्कार, नव्या धर्माचा स्वीकार करण्याची निर्माण झालेली प्रवृत्तीचे चित्रण कथातून आढळते.

कालक्रमानुसार पाहिले तर आण्णाभाऊ साठी हे प्रमुख दलित कथालेखक ठरतात. कवी वृत्तीच्या या लेखकाने दलित जीवनाचे अनेकांगी दर्शन आपल्या कथेतून प्रभावीरीतीने चित्रित केले आहे. त्यानंतर बंधुमाधव, ना. रा. शेंडे यांनीही दलित जीवनावर कथा लिहिल्या व नंतर प्रमुख कथालेखक म्हणून शंकरराव खरातांच्याकडे पाहिले जाते त्यांनी ' बारा बलुतेदार ', ' तडीपार ', ' सांगावा ' सारख्या कथासंग्रहातून दलित जीवनाचे दर्शन घडविले. त्यानंतर बाबुराव बागुलांनी वास्तव जीवनाचे चित्रण करणारी कथा लिहिली.

१९६० नंतरचा काळ दलित आणि बौध्दांच्या आंदोलनाच्या दृष्टीने फार महत्त्वाचा आहे. या आंदोलनातूनच दलित साहित्य चळवळीला प्रारंभ झाला. दलित कथालेखनामध्ये याचा प्रभाव पडलेला दिसून येतो. केशव मेश्राम, वामन होवाळ, अर्जुन डांगळे, अमिताभ, अविनाश डोळस, बाबुराव गायकवाड, माधव कोंडविलकर, अरुण कांबळे, सुधाकर गायकवाड सारख्या लेखकांनी दलितांच्या

समकालीन जीवनाचा वेध घेणाऱ्या कथा लिहिल्या दलितांच्या जीवनात नव्याने निर्माण झालेले प्रश्न, दलितवर्गीयांच्या कुटुंबात निर्माण होणारे ताणतणाव हे विषय नवोदित कथाकार चित्रित करु पाहात आहेत. दलितांच्या समकालीन जीवनाचा वेध घेणाऱ्या कथाकारांच्या कथांचा येथे विचार करु.

बाबुराव बागूल यांचे ' जेव्हा मी जात चोरली होती ' आणि ' मरण स्वस्त होत आहे ' हे कथासंग्रह प्रसिध्द आहेत.

बाबूरावांच्या कथेने पहिल्यांदा जर कोणते योगदान दिले असेल तर ते म्हणजे विद्रोह ! त्यांच्या कथेत जन्मजात अस्पृश्यतेमुळे अस्पृश्यांच्या वाट्याला येणाऱ्या दु:खाचे चित्रण येते. यात ' जेव्हा मी जात चोरली होती ' या कथेतील ' मी ' हा अस्पृश्य असल्यामुळे जात चोरुन नोकरी मिळवतो. तर काशिनाथ हा स्वाभिमानी आहे. त्याला आपल्या जातीविषयी अभिमान आहे. तर ' विद्रोह ' या कथेत जय नावाचा भंगी तरुण जीवनाची स्वप्ने पाहतो आणि त्याच्या या स्वप्नांचा जन्मजात अस्पृश्यतेमुळे कसा चुराडा होतो याचे चित्रण आहे. ' सुर्याचे सांगाती ' या कथेत मानवी जीवनात इथल्या समाजव्यवस्थेमुळे काळोख पसरलेला असला तरी त्यात सुर्यांचेही सांगाती आहेत हे आपल्या दु:खी जीवनात कधी तरी सुख भोगायला मिळेल या जाणिवेने ते दु:खाचा प्रतिकार करीत राहतात. स्वत:च्या कथांविषयी बाबूराव एका मुलाखतीत म्हणतात की, " अस्पृश्यतेच्या जाणिवेतून माझ्या मनात विद्रोही भावना निर्माण झाली. माणूसपणाची जाणीव, हक्काची जाणीव माणसात विद्रोहाची भावना प्रभावी करते "[१४]

वरिल कथांचे विवेचन बघून बाबूरावांचे म्हणणे बरोबर वाटते. त्यांनी आपल्या कथेतून विद्रोहाचे महत्त्व पटवून दिले. तसेच त्यांनी कथेतून समाजातील आर्थिक वर्ग आणि सामाजिक वर्ण यांच्यातील भेद आणि यातून निर्माण होणाऱ्या यातनांचे चित्रण केलेले आहे. त्यांची कथा ही मराठी कथेची उंची वाढववणारी अशीच आहे. त्यांच्या ह्या अनुभवातून साकार झालेल्या आहेत.

केशव मेश्राम यांचा ' खरवड ' आणि ' पत्रावळ ' हे कथासंग्रह प्रसिध्द आहेत.

मेश्रामांनी दलित व झोपडपट्टीतील जीवनाचे चित्रण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. 'खरवड' या कथासंग्रहातील ' मोचा ' या कथेत सुशिक्षित दलित तरुण चळवळीच्या नावाखाली भ्रष्टाचार कसा करीत असतो हे दाखवून दिलेले आहे. ' पाठवणी ' या कथेत दलित मुलींना नोकरीचे अमिष दाखवून मुंबईस नेऊन वेश्या व्यवसायास लावणाऱ्या गीताबाईचे चित्रण येते. तर ' पत्रावळ ' मधल्या ' बांडगूळ ' या कथेत ढोंगी दलित नेतृत्वाचे चित्रण येते. तसेच ' आसरा ' या कथेतही झोपडपट्टीतील माणसे जगण्यासाठी कशी धडपडतात याचे चित्रण येते. केशव मेश्रामांच्या कथांच्या संदर्भात चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात की, '' दलित कथेच्या वास्तवाची यत्किंचतही कमी न करता कलात्मक मूल्यांचे भान राखून केशव मेश्राम यांनी कथा लिहिल्या. ''[१५] यांचे मत बरोबर असलेले दिसून येते.

मेश्रामांची कथा वास्तववादी अशीच वाटते. त्यांनी आपल्या कथातून समकालीन जीवनाचे चित्रण केलेले आहे. बागूलांबरोबर मेश्रामांनीही दलितांचे प्रश्न मांडलेले दिसून येतात. त्यांनी झोपडपट्टीतील जीवनाचे चित्रण हुबेहूब केलेले आहे. यांनी यासाठी भाषेचा वापरही बोलीतून केलेला आहे. सर्व स्तरातील भाषा सहजतेने वापरतात.

वामन होवाळ यांचे ' बेनवाड ', ' येळकोट ', ' वारसदार ' हे कथासंग्रह प्रसिध्द आहे.

वामन होवाळांनी प्रामुख्याने ग्रामीण भागातील दलित जीवनाचे चित्रण केलेले आहे. आजच्या दलितांच्या जीवनाच्या वेध घेणाऱ्या कथा लिहिल्या आहेत. ' बेनवाड ' या कथासंग्रहातील ' मजल्याचं घर ' या कथेतील बयाजी महार व त्याची मुले या दलितांच्या जीवनातील चित्रण येते. तर ' देव पावला ' ही कथा म्हणजेच डॉ. आंबेडकरांनी दलितांना देव, धर्म यांचा त्याग करण्याचा जो विचार दिला. त्या विचाराचा संदेश देणारीच ही कथा आहे. ' यळकोट ' कथासंग्रहातील ' अंगारा ' या कथेत देवऋषीपण करणारा लखूदादा महार जातीचा आहे. तो डॉ. आंबेडकरांच्या विचाराने भारावून जातो आणि देवऋषीपण सोडून बौध्दधर्म स्वीकारतो. तर ' वारसदार ' मध्ये दोन भिन्न मनोवृत्तीच्या भावांचे चित्रण येते.

होवाळांच्या कथांत ग्रामीण भागातील दलित वर्गातील जीवनाचे चित्रण आहे व त्यात वास्तवता दिसून येते. धर्मांतर करुनही महारांवर पूर्वीप्रमाणेच सवर्णांकडून अन्याय, अत्याचार आजही होतो आहे. याचे चित्रण येते. त्यांनी दलित व दलितेतर जीवनाचेही चित्रण केले आहे. त्यामध्ये दलित व दलितेतर हा भेद नष्ट व्हावा ह्या जाणिवेतून लेखन केलेले दिसून येते.

अर्जुन डांगळे यांचा ' ही बांधावरची माणसं ' हा कथासंग्रह प्रसिध्द आहे.

या कथासंग्रहात ग्रामीण भागातील दलितांच्या समकालीन जीवनाचे चित्रण येते ' ही बांधावरची माणसं ' या कथेत आजही दलित समाज अत्याचार सहन करतो आहे याचे चित्रण येते. तर ' आणि बुध्द मरुन पडला ' या कथेतील दलितांच्यातील अंतर्गत ताणतणावाचे चित्रण येते. व ' प्रमोशन ' या कथेत दलित समाजातील जे शिकले सवरले व चांगल्या हुद्यावर नोकरीला लागले त्यांच्यात पांढरपेशावृत्ती निर्माण होऊ लागली. तर दुसऱ्या कथेत बेकार तरुणाचा जीवनात झालेला कोंडमारा याचे ' गारदी ' या कथेत चित्रण येते. ' निष्ठावंत ' या कथेत डॉ. बाबासाहेबांच्या विचाराशी प्रामाणिक राहिलेल्या एका सुशिक्षित दलित तरुणाचे चित्रण येते.

अर्जुन डांगळेनी दलित जीवनातील विविध प्रश्नांना वाचा फोडली व स्वसमाजातील अस्वस्थ करणारी स्वार्थी, बेइमान प्रवृत्तीवर आपल्या कथांतून प्रहार केला. समकालीन जीवनातील दलित माणसे अजूनही संस्कृतीच्या दडपणाखाली जीवन जगत आहे याचेही चित्रण येते.

अमिताभ यांचा ' पड ' हा कथासंग्रह प्रसिध्द आहे.

अमिताभ दलित कथाकारांच्यामध्ये महत्त्वाचे कथालेखक म्हणून उल्लेख केला जातो. त्यांनी दलितांच्या समकालीन जीवनातील विविध अनुभव कथेतून चित्रित करतात. ' पड ' या कथेमध्ये डॉ. आंबेडकरांनी ' मेलेल्या जनावरांचे मांस खाऊ नका ' असा संदेश दिलेला असताना सुध्दा येथील महार मंडळी अगतिक होऊन मेलेल्या जनावराच्या मांसासाठी भांडतात याचे हुबेहूब वर्णत करतात. ' तडा ' नावाच्या कथेत दलितांच्यामधील ताणतणाव याचे चित्रण येते. ' पोळलेल्या पाऊलखुणा ' मध्ये धर्मांतर करुनही दु:ख भोगावे लागणाऱ्या दलिताचे वर्णन येते. त्यांच्या कथेची प्रामुख्याने दोन वैशिष्टये अविनाश डोळस यांनी सांगितली आहेत. " एक- ही कथा मानसिक द्वंद्व प्रामुख्याने चित्रित करते व

दोन - हे द्वंद्व जाणीवपूर्वक वेगळ्या पध्दतीने मांडण्याचा प्रयत्न करते " [१६] यांची ही वाक्ये योग्य वाटतात. कारण दलित वर्गातील मानसिकता ही अशीच होती व ती चित्रित करण्याचा प्रयत्न अमिताभनी केलेला आहे. त्यांनी आपल्या अनुभवनातून व वास्तव कक्षात घेवून कथा लिहिलेल्या दिसतात. त्यामुळेच समकालीन जीवनातील व्यक्तीची मानसिकता, विचार, अगतिकता याचे चित्रण प्रभावी झालेले आहे. त्यांची कथा वामन होवाळांच्या कथेसारखीच भासते. परंतु वेगळा ठसाही उमटवते.

सारांश, १९४० पासून दलित कथा लिहिली जावू लागली परंतु १९६० पासून साहित्यात तिला वेगळे स्थान मिळाले व आण्णाभाऊ साठे पासून दलित कथा लिहिली जावू लागली. दलित कथालेखनाचा प्रवाह ना. रा. शेंडे, बंधुमाधव, शंकरराव खरात पासून सरकत येवून १९६० पर्यंत बाबुराव बागूलांपर्यंत येवून पोहचला. बागूलांनी वास्तव जीवनाचे चित्रण आपल्या कथांतून केले. पुढे केशव मेश्रामनी दलित व झोपडपट्टीतील जीवनाचे चित्रण केले तर वामन होवाळ, अर्जुन डांगळे, अमिताभ यांनी ग्रामीण भागातील दलितांच्या समकालीन जीवनाचे चित्रण केले. तसेच अविनाश डोळस, योगिराज वाघमारे, माधव कोंडविलकर, अरुण कांबळे, सुधाकर गायकवाड सारख्या कथाकारांनीही दलितांच्या समकालीन जीवणाचा वेध घेणाऱ्या कथा लिहिल्या.

दलित समकालीन कथा ही अजूनही स्वत:पूर्ती मर्यादित असलेली दिसून येते कथेचा पाया हा अजूनही आत्मानुभव हाच आहे. त्यांनी चित्रित केलेले वास्तव हे त्यांच्या स्वत:च्या तसेच स्वत:च्या जवळच्या माणसाच्या वाट्याला आलेले आहे. समकालीन जीवनाचा वेध घेणाऱ्या या कथांतून त्यांचा जीवनात आजही अंधश्रध्दा, परंपरा देवधर्म यांचे असलेले स्थान, सवर्णांच्याकडून त्यांचा होणारा छळ ह्या बाबी टिकून राहिल्या आहेत.

समकालीन कथालेखनाचे स्वरूप पाहत असताना ग्रामीण, नागर, दलित असा प्रवाह आपण पाहिला परंतु काही लेखिका अशा आहेत. लेखिकांचा आपण समाकालीन कथा लेखिका म्हणून उल्लेख करु शकतो. परंतु आता इथे आपण स्त्री लेखिकांचा आढावा न घेता फक्त समकालीन कथा लिहिणाऱ्या लेखिकांचा थोडक्यात परिचय करुन घेणार आहोत.

## ❖ समकालीन लेखिकांचे कथालेखन :-

समकालीन लेखिकांचे कथालेखन पाहत असताना असे दिसून येते की समकालीन स्त्रीजीवनातील प्रश्न हे १९७० ते ८० च्या काळात मांडले गेले. समकालीन कथेचा आढावा पाहिला त्यात १९४५ पासून समकालीन काळ सुरु पण १९६० नंतरची कथा ही खऱ्या अर्थाने समकालीन ठरलेली दिसते. परंतु १९६० नंतरची कथा ही खऱ्या अर्थाने समकालीन ठरलेली दिसते. परंतु १९६० पूर्वीसुध्दा समकालीन जीवनावर कथा लिहिल्या गेलेल्या आहेत. त्यामध्ये आपण प्रथम कमल देसाई यांच्या कथेचा उल्लेख करु शकतो. त्यानंतर तारा वनारसे, विजया राजाध्यक्ष आहेत. तर १९६० नंतर गौरी देशपांडे, सानिया, आशा बगे, प्रिया तेंडूलकर सारख्या लेखिका उदयाला आल्या ज्यांच्या लेखनाने वाचकांचे लक्ष वेधून घेतले. त्यांचाच आता आपण समकालीन स्त्री जीवनाचे चित्रण कशा प्रकारे केले यासाठी थोडक्यात परिचय करुन घेणार आहोत.

कमल देसाई यांचा ‘ रंग ’ हा कथासंग्रह प्रसिध्द आहे. कमल देसाईंच्या या कथासंग्रहातून जो अनुभव व्यक्त होतो तो अत्यंत व्यक्तिकेंद्री आहे. परंतु त्यांच्या कथा विशेष अभ्यासनीय आहेत. पण त्या सामान्य वाचकाला समजणाऱ्या नाहीत त्यासाठी जाणकार वाचकच असावा लागतो याचे उदाहरण म्हणजे ‘ महादेववाडी ’, ‘ रंग ’, ‘ आम्हा घरी धन ’, ‘ तिळा बंद ’ इ. कथा आहेत. त्यांच्या कथातून जगण्यातला एकटेपणा, विसंगती, वैफल्य जाणवते. ‘ महादेववाडी ’ मधील आपण मानाने जगण्यालायक नाही, आपल्याला तडाखेच मिळाले पाहिजेत. यातच सुखावणारी सुमा मोकाशी, तर ‘ तिळा बंद ’ मधील अतिशय आत्मकेंद्री उदासीन व आपण आपल्या हातातून निसटून जाऊ या भीतीने जीवनाला नाकारणारी व एकटेपणा स्वीकारणारी उर्मिला राजे अशा स्त्रिया येतात. ‘ काळासूर्य ’ सारखी कथा कमलाबाईंच्या कथात उंची गाठणारी आहे. त्यातील सर्वच वातावरण विचित्र व माणसेही विकृत दिसून येतात.

कमलाबाईंनी स्वतःच्या व्यक्तीगत अनुभवातूनच आपले कथाविश्व साकार केले आहे. त्यांच्या कथातून येणारे प्रमुख पात्र लेखिकाच असते. मध्यमवर्गीय, नोकरी करणाऱ्या, अविवाहित

स्त्रीचा भिन्न कारणांमुळे होणारा कोंडमारा, परिस्थितीशी संघर्ष या कथेतून दिसून येतो या कथा स्त्रीकेंद्री व स्त्रीप्रधान आहेत.

तारा वनारसे यांचा ‘ पश्चिमकडा ’ हा कथासंग्रह प्रसिध्द आहे.

वनारसे यांच्या कथांतून मानवी मनातील अतिशय सूक्ष्म व क्षणाक्षणाला रंग बदलणाऱ्या भावनांचे चित्रण येते. हे चित्रण त्या अतिशय कुशलतेने करतात. ‘ पश्चिमकडा ’, ‘ सारंग ’, ‘ अस्मिता ’, ‘ पशू ’, ‘ सहस्त्राक्ष ’, ‘ पुठ्ठयाचा समुद्र ’ अशा काही वेधक कथा त्यात आहेत. ‘ सहस्त्राक्ष ’ ही कथा त्यांच्या लेखनाची सर्व वैशिष्टये दाखवते. पुरूषी वासनेची एका संवेदनाक्षम स्त्रीमनावर झालेली प्रतिक्रिया त्यात चित्रित केली आहे. त्यांच्या कथेतील चित्रणामागची मुख्य भावना ही दु:खाची असते म्हणूनच गंगाधर गाडगीळ त्यांचे वर्णन “ धपापत्या उराच्या लेखिका ” [१७] म्हणून करतात व हे रास्त वाटते. त्यांची पात्रे सदैव कुठल्यातरी दु:खाने कुढणारी, दु:खाला कुरवाळण्यातच सुखावणारी, अशीच असतात. त्यांनी स्त्रीच्या संवेदनाक्षम मनातून निर्माण झालेल्या व्यथांचे अधिक चित्रण केले.

विजय राजाध्यक्ष यांचे ‘ अधांतर ’, ‘ विदेही ’, ‘ अनोळखी ’, ‘ अकल्पित ’, ‘ पारंब्या ’ ‘ कमान ’, ‘ अखेरचे पर्व ’ असे कथासंग्रह प्रसिध्द आहेत.

राजाध्यक्षांच्या कथांतून स्त्री-पुरूषांच्या विशेषत: स्त्रियांच्या विविध भाववस्थांचे चित्रण करण्याचा प्रयत्न केला आहे. याचे उदाहरण म्हणजे ‘ अधांतर ’ हा कथासंग्रह आहे. तर त्यांच्या ‘ फुटेल ’, ‘ लोट ’, ‘ जन्म ’ , ‘ अंतराळ ’, ‘ माती ’, ‘ पुरूष ’ अशा काही कथांतील आशय वेगळा नवा आहे. ‘ जन्म ’ या कथेतील मूल जन्माला येण्याच्या आदल्या दिवशी, वेगवेगळ्या अवस्थांचे व मन:स्थितीचे चित्रण येते. ‘ अंधाराचा अर्थ ’ मध्ये अंधारातील एकांताचा अनुभव वेगवेगळ्या प्रतिमांनी रंगवला आहे. त्यांच्या कथेला स्वप्नाळू गोष्टींची ओढ आहे. ‘ लोट ’, ‘ आवर्त ’, ‘ केळी ’, ‘ अंतराळ ’ सारख्या कथातील नायिका स्वप्नाळू वाटतात. त्यांच्या कथेतील अनुभव फक्त स्त्रीयाच घेवू शकतात. त्यांनाही ताराबाईप्रमाणेच ‘ दु:ख ’ या भावनेचे आकर्षण आहे. परंतु ही भावना अधिक

प्रभावीपणे प्रकट करता येत नाही. त्यांची भाषा मात्र रेखीव आहे. कथेसाठी त्या नवनवीन विषय निवडतात.

गौरी देशपांडे यांचा ' आहे हे असं आहे ' हा कथासंग्रह प्रसिध्द आहे.

देशपांडेच्या कथामधून आधुनिक स्त्री आणि तिचे मन ह्या गोष्टी दिसतातच त्याचबरोबर प्रचलित पितृसत्ता समाजपध्दतीतील पुरूषी वर्चस्वाचे चित्रणही आढळते. त्यांच्या कथामधून मुक्त स्त्रीच्या विचारांची प्रचिती येते म्हणूनच अंजली कीर्तन म्हणतात की, " मुक्तपणा हीच तिची सहजस्थिती " [१८] आहे. त्यांचे हे वाक्य रास्त वाटते. कारण स्त्रीचे प्रश्न त्यांनी प्रखरपणे मांडले आहेत. आजच्या स्त्रीचे परिस्थितीनुसार प्रश्न बदललेले व ते प्रश्न मुक्तपणे गौरी देशपांडेनी कथेतून आणले. त्यांची कथा भावुकता, हळवेपणा टाळते व वास्तवाचे चित्रण करते.

प्रिया तेंडूलकर यांचा ' ज्याचा त्याचा प्रश्न ' हा कथासंग्रह प्रसिध्द आहे.

तेंडूलकरांच्या कथासंग्रहातून आधुनिक जगातील स्त्रीचा कोंडमारा, तिला पुरूषांच्या जगात येणारे विविध विपरित अनुभव, विवाह व कुटुंब-संस्थामधील अर्थहीनता हे विषय आहेत. अन्याय सहन करणाऱ्या स्त्रीची विविध रूपे रेखाटलेली आहेत. अजित काळे ललित लेखात म्हणतात की, " एक विशिष्ट स्त्रीमुक्तिवादी दृष्टिकोन गृहीत धरून या कथा लिहिलेल्या आाहेत. " [१९] हे मत अगदी बरोबर वाटते कारण स्त्री ही कितीही शिकली तरी तिला पुरूषी वर्चस्वाखालीच जगावे लागत आहे याचे दु:ख लेखिकेला होत असून कथांतून स्त्रीमुक्तीचेच वर्णन अधिक झालेले आहे. स्त्रीने सर्व बंधनांना तोडून जगले पाहिजे हा विचार असला तरी पुरूष प्रधान संस्कृतीचे भानही कथेत ठेवले आहे.

सानिया व आशा बगेनी कथा लिहिल्या परंतु कादंबरी इतके प्रभावी लेखन कथांमध्ये झालेले नाही. सानियांचा ' शोध ', ' प्रतीती ', ' दिशा घरांच्या ' इ. कथासंग्रह प्रसिध्द आहेत. तर आशा बगेंनी ' माखा ', ' अत्तर ', ' पूजा ' इ. कथासंग्रहह प्रसिध्द आहेत.

सानियाच्या कथामधून स्त्री शक्यतो पुरूष यांच्यातील भावसंबंधाचे सूक्ष्म चित्रण आलेले आहे. त्यांनी शक्यतो नेहमीची कथेतील वळणे टाळलेली दिसतात. तर आशा बगेंच्य कथा जुन्या पध्दतीच्या

कुटुंबातील माणसांच्या संबंधातील नाजुक धाग्यांची उकल आढळते. स्त्रियांचे भावविश्व उलगडणाऱ्या कथा त्या लिहितात व आश्रित असल्याचे दु:ख त्याच्या कथेत वारंवार येते.

सारांश, लेखिकांनी समकालीन जीवनातील स्त्रिच्या व्यथा मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. आज स्त्री मग ती घरातील असो किंवा घराबाहेर वावरणारी असो तिला पुरूषप्रधान संस्कृतीतच रहावे लागते व तिच्यावर होणारा अन्याय सहन करावाच लागतो व जर तिने विद्रोह केलाच तर तिला आणखीन वेगळ्या प्रश्नांना, संकटांना तोंड द्यावे लागत असते. या सर्वांचे विवेचन समकालीन कथातून झालेले दिसून येते.

## ❖ समारोप :-

समकालीन कथालेखनाचे स्वरूप पाहात असताना असे दिसून आले की कालखंडानुरूप साहित्य प्रवाह बदलत गेला. १८१८ पासून सुरु झालेला कालखंडाचा प्रवाह १९६० पर्यंत येवून पोहचला परंतु याच्या मधल्या काळात अर्वाचीन, आधुनिक समकालीन साहित्य निर्माण झाले १८१८ पासून कथा लिहिली जावू लागली व कथेची सुरुवात हरिभाऊनी केली १९४५ पासून समकालीन कथेची सुरुवात झाली व १९६० नंतर खऱ्या अर्थाने कथा बहरली आणि कथेने नवे रूप धारण केले. कथा समकालीन जीवनाचे चित्रण करु लागली. कथेतील समकालीन जीवनाचे चित्रण ग्रामीण, नागर, दलित या तीन प्रवृत्तीनुसार येवू लागले.

१९४५ पासून समकालीन कथा सुरु झाली तरी १९६० नंतरची कथा समकालीन मानली जाते. समकालीन ग्रामीण कथालेखनामध्ये माडगूळकर अग्रेसर होते तर कथा पुढे नेण्यामध्ये रा. रं. बोराडे, उध्दव शेळके, आनंद यादव हे कथाकार सहभागी झाले व समाकालीन ग्रामीण जीवनातील वास्तववादी चित्रण चारूता सागर, सखा कलाल, महादेव मोरे सारख्या लेखकांनी केले.

समकालीन नागर कथालेखन गंगाधर गाडगीळ, गोखले, भावे पासून सुरु झाले. त्यानंतर जी. ए. कुलकर्णी, चित्रे, जातेगावकर, डांगे, श्याम मनोहर सारखे लेखक नव्या प्रेरणा व नवा कसदारपणा घेऊन लिहिताना दिसत आहेत व त्यांच्या वाङ्मयाने आज नव्या अपेक्षा निर्माण केल्या आहेत.

समकालीन दलित कथालेखनाची सुरूवात आण्णाभाऊ साठेनी केली व नंतर ना. रा. शेंडे, बंधुमाधव, शंकरराव खरात यांनी कथा पुढे सरकवली पण १९६० पासूनच दलित कथेला स्वत:चे स्थान मिळाले. बाबुराव बागूल यांनी दलितांच्या वास्तववादी जीवनांचे चित्रण केले. केशव मेश्रामांनी झोपडपट्टीच्या जीवनाचे चित्रण केले तर वामन होवाळ, अर्जुन डांगळे, अमिताभ यांनी ग्रामीण भागातील दलिताचे अतिवास्तववादी चित्रण केले. तसेच अविनाश डोळस, योगिराज वाघमारे, माधव कोंडविलकर, अरुण कांबळे, सुधाकर गायकवाड सारख्या कथाकारांनीही दलितांच्या समकालीन जीवनाचा वेध घेणाऱ्या कथा लिहिल्या.

समकालीन लेखिकांमध्ये कमल देसाई, तारा वनारसे विजया राजाध्यक्ष यांनी स्त्रीयांच्या दु:खाचे चित्रण केले तर गौरी देशपांडे, सानिया, प्रिया तेंडूलकर, आशा बगेनी आधुनिक स्त्रीचे प्रश्न मांडले.

समकालीन कथालेखनाचे स्वरूप पाहिले तर कथेच्या तंत्रात, मांडणीत आणि आशयात बदल झालेला आहे हे दिसून येते. मुख्य म्हणजे मानवी अस्तित्व विषयक प्रश्न मांडण्याचा कथाकार प्रयत्न करत आहेत. तर स्त्रियांच्या आणि दलितांच्या अनुभवास येणारी सामाजिक विषमता, शहरी आणि ग्रामीण परिसरातील राजकारण, मध्यमवर्गीय व्यक्तीची अगतिकता हे विषय या कथामधून आलेले आहेत.

अशा प्रकारे समकालीन कथाकारांनी कथालेखनाचे अनेक प्रयोग केले आणि मराठी कथा विकसित करण्याचा प्रयत्न केला. या दशकातच रवींद्र शोभणे या कथालेखकाचा उदय झाला व त्यांनी आपल्या लेखनातून ठसा उमटवण्याचा प्रयत्न केला. रवींद्र शोभणे आपल्या कथासाहित्यातून ग्रामीण आणि नागर अशा दोन्ही स्तरातील मानवी जीवनाचे चित्रण करतात. त्यांची कथा प्रायोगिक पातळीवरचे नाविन्य दाखवत नसली तरी ती कथा महत्त्वाची मानली जाते व या कथेचे महत्त्व आता आपण पाहणार आहोत.

# संदर्भ आणि टिपा


१) व. दि. कुलकर्णी - 'अर्वाचीन मराठी सारस्वतरकार'
मॅजेस्टिक बुक स्टॉल, गिरगाव, मुंबई-४
'उपोद्घात' - पृ.१

२) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ - वाङ्मयाप्रवाह 'समकालीन साहित्य'
संपादन - डॉ. भालचंद्र फडके, पुणे.
'समकालीन म्हणजे काय ?' पृ. २

३) गंगाधर गाडगीळ - 'सत्यकथा' चा सप्टेंबर १९५५ चा अंक

४) डॉ. नागनाथ कोत्तापल्ले - 'ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि शोध',
मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.
'मुलाखत : रा. रं. बोराडे यांनी' पृ. १२४

५) चंद्रकांत बांदिवडेकर - 'मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप', - कथा,
गो. मा. पवार व म. द. हातकणंगलेकर (संपा.)
पॉप्यूलक्र प्रकाशन, मुंबई, पृ. १५०

६) म. द. हातकणंगलेकर - 'मराठी कथा : रूप आणि परिसर'
सुपर्ण प्रकाशन, पुणे. पृ. ४६

७) - तत्रैव पृ. ४७

८) - तत्रैव पृ. १११ व ११२

९) आनंद यादव - ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि समस्या,
मेहता पब्लिशिंग हाऊस,पुणे. पृ. १५४

१०) इंदूमती शेवडे - 'मराठी कथा उगम आणि विकास'
सोमैया पब्लिकेशन्स प्रा.लि., मुंबई, पृ. ४६३

११) दि. पु. चित्रे - स्वत:च्या लेखनासंबंधीचे विचार
'सत्यकथा' जुलै १९६७, पृ. ४८

१२) इंदूमती शेवडे - उनि. पृ. ४८७

१३) इंदूमती शेवडे - उनि. पृ. ५०५

१४) बाबुराव बागूल - - दलित साहित्य : आजचे क्रांतिविज्ञान ' बुध्दिस्ट पब्लिशिंग हाऊस, नागपूर, ' मुलाखती ' पृ. १६८

१५) चंद्रकांत बांदिवडेकर - मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप गो. मा. पवार व म.द. हातकणंगलेकर (संपा.) पॉप्युलर प्रकाशन, मुंबई. पृ. १५०

१६) अविनाश डोळस - ' मराठी दलित कथा ' सविता प्रकाशन, औरंगाबाद, पृ. ६३

१७) गंगाधर गाडगीळ - ' खडक आणि पाणी ' पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पृ. ७९

१८) अंजली कीर्तने - ' गौरी देशपांडे - दशकातील साहित्यिक ' ललित मार्च, १९८९, पृ. ११

१९) अजित काळे - ' गौरी देशपांडे व प्रिया तेंडूलकर यांचे कथालेखन ' ललित कथाविशेषांक जुलै, १९८८, पृ. ४५